पीकपाणी

# बीटरूटची लागवड



**आशुतोष चिंचोळकर**
(मो.नं. ९१४६९६६२२२)
कृषिमित्र, यवतमाळ

अलीकडच्या काळात बीटरूटमधील पोषक द्रव्यांमुळे त्याचा नियमित आहारामध्ये वापर वाढत आहे. शहरी भागातील लहान- मोठ्या हॉटेलमध्ये याची मागणी सतत वाढतच आहे. बीटचा सॅलड म्हणून रोजच्या आहारात उपयोग करतात. यामुळे बीटरूटची व्यापारी तत्त्वावर लागवड होत आहे.

**जमीन** : बीटरूट हे जमिनीत वाढणारे कंदमूळ असल्यामुळे याच्या लागवडीसाठी भुसभुशीत, पाण्याचा उत्तम निचरा होणारी व ६ ते ७.५ इतका सामू असणारी जमीन निवडावी. भारी व अतिभारी जमिनीत बीटरूटची लागवड केल्यास मुळांचा आकार व्यवस्थित गोल होत नाही.

**लागवड** : बीटरूटचे ७ ते १० किलो बियाणे एक हेक्टर लागवडीसाठी पुरेसे आहे. बियाण्यांची लागवड टोकण पद्धतीने किंवा पाभरीने करावी. १५ ते २० सें.मी. अंतरावर बिया टोकून लागवड करावी. बीटरूटचे एक बी म्हणजे दोन किंवा अनेक बियांचा समूह असतो. त्यामुळे पेरणीनंतर विरळणी करून एका ठिकाणी एकच रोप ठेवावे. उगवण चांगली होण्यासाठी बियाण्याला १० ते १२ तास पाण्यात भिजवून, सावलीत वाळवून लागवडीसाठी उपयोगात आणावे.

**खते व पाणी व्यवस्थापन** : बीटरूट हे कंदमुळे असल्यामुळे त्याची भूमिगत वाढ चांगली होण्यासाठी व जमीन भुसभुशीत राहण्यासाठी प्रतिहेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीची पूर्वमशागत करताना मिसळून घ्यावे. या पिकाला ६० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश प्रतिहेक्टर द्यावे. नत्राची अर्धी मात्रा आणि स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावी. नत्राची अर्धी मात्रा पेरणीनंतर ४ ते ६ आठवड्यांनी द्यावी. पीकवाढीच्या काळात पाण्याची कमतरता पडू देऊ नये.

**आंतरमशागत** : बियाण्यांची पेरणी केल्यानंतर विरळणी करणे आवश्यक आहे. विरळणी करताना एका ठिकाणी एकच रोप ठेवणे आवश्यक आहे. पिकातील तण खुरप्याने काढून निंदणी करून शेत तणविरहित ठेवावे. पीक ४५ दिवसांचे झाल्यावर मुळाला भर द्यावी. पीक लागवडीनंतर ८० ते १०० दिवसांत तयार होते. कमी कालावधीत तयार होणारे पीक असल्याने हे आंतरपीक म्हणूनही घेता येते.

**कीड व रोग नियंत्रण** : या पिकावर फारसे रोग व कीटक आढळून येत नाहीत. परंतु काही प्रमाणात पाने खाणारी अळी तसेच हिरवी उंट अळी यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडींच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन १० मि.लि. हे कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. बीटरूट या पिकावर पानावरील ठिपके या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव ढगाळ वातावरणात येतो. याच्या नियंत्रणासाठी १५ दिवसांच्या अंतराने ताम्रयुक्त औषध किंवा १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. तसेच केवडा या रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेम एम-४५ या बुरशीनाशकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

**काढणी** : बीटरूटच्या कंदाची वाढ ३ ते ५ सें.मी. झाल्यावर काढणी करावी. चांगल्या प्रतीचे बीटरूट मिळविण्यासाठी ते आतून स्पंजसारखे होण्यापूर्वी काढणी करणे आवश्यक आहे. जमीन वाफसा अवस्थेत असताना मुळांना- कंदांना इजा होणार नाही अशा रीतीने हातांनी उपटून काढणी करावी. काढणीनंतर कंदांची प्रतवारी करावी. कंद विक्रीला पाठवण्यापूर्वी त्याची पाने काढून टाकावीत आणि कंद पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावे. ■